**कृपया प्रसिध्दीसाठी -** **12 जून 2010**

**राम नाईक, राजेंद्र गावित यांच्या यशस्वी मध्यस्थीनंतर**
**तारापूर प्रकल्पपीडित कर्मचा-यांनी बेमुदत उपोषण सोडले**

**मुंबई, शनिवार :** तारापूर अणुऊर्जा प्रकल्प 1 व 2 चे प्रकल्पपीडित गेल्या दोन दशकांहून अधिक काळ हंगामी / कंत्राटी कर्मचारी म्हणूनच काम करीत होते. कायमस्वरुपी नोकरीसाठी 7 जून पासून बेमुदत उपोषणाला बसलेल्या या प्रकल्पपीडितांनी माजी केंद्रिय मंत्री श्री. राम नाईक व आमदार श्री. राजेंद्र गावित यांच्या यशस्वी मध्यस्थीमुळे काल आपले बेमुदत उपोषण सोडले. श्री. नाईक यांच्या कार्यालयातून प्रसिध्द केलेल्या पत्रकात या यशस्वी आंदोलनाची माहिती देण्यात आली आहे.

देशाला अणुऊर्जा मिळावी यासाठी आपल्या घरावर पाणी सोडणा-या प्रकल्पपीडितांना रोजगार उपलब्ध करुन देण्याचा वायदा करण्यात आला होता. प्रत्यक्षात या प्रकल्पपीडितांना वर्षानुवर्षे कंत्राटी किंवा हंगामी कामेच देण्यात आली, आता तर न्यक्लिअर पॉवर कॉर्पोरेशनने कधी कामगार कपातीचे कारण दाखवून तर कधी वय, शिक्षण अशा अटी पुढे करुन हंगामी कामावरील या प्रकल्पपीडितांना काम देणेच बंद केले. यामुळे वांरवार मागणी करुनही रोजगार न मिळालेल्या प्रकल्पपीडितांनी गेल्या वर्षी 14 ऑगस्टला बेमुदत उपोषण सुरु केले होते. त्यावेळी जिल्हाधिका-यांच्या मध्यस्थीनंतर त्यांनी ते मागे घेतले. परंतु वारंवार स्मरण देऊनही न्यूक्लिअर पॉवर कॉर्पोरेशनने प्रकल्पपीडितांना चर्चेलाही न बोलवल्याने 7 जून रोजी पुन्हा एकदा या प्रकल्पपीडितांनी बेमुदत उपोषण सुरु केले.

माजी केंद्रिय मंत्री श्री.राम नाईक यांनी सलग पाचवेळा या भागाचे लोकसभेत प्रतिनिधीत्व केले होते. साहजिकच ते तात्काळ आंदोलनकर्त्या प्रकल्पपीडितांच्या भेटीसाठी गेले. त्याचवेळी कॉंग्रेसचे स्थानिक आमदार श्री. राजेंद्र गावितही तिथे आले. या दोघांनीही पुढाकार घेऊन न्यूक्लिअर पॉवर कॉर्पोरेशनच्या प्रशासनाशी बोलणी केली. श्री.नाईक यांच्या विनंतीमुळे कॉर्पोरेशनचे अध्यक्ष डॉ. एस.के.जैन यांनी गुरुवारी रात्री सर्वांना चर्चेसाठी पाचारण केले. श्री.नाईक, श्री.गावित यांच्यासह प्रकल्पपीडितांचे प्रतिनिधी सर्वश्री विजय तामोरे, संतोष शांताराम राऊत, रवींद्र मारुति हंबिरे, रामदास विष्णु तामोरे, मंगेश हरेश्वर पागधरे यांनी डॉ.जैन यांच्याशी चर्चा केली.

या चर्चेनंतर डॉ. जैन यांनी शिष्टमंडळाला तोडगा काढण्याचे आश्वासन दिले. तारापूर अणुऊर्जा प्रकल्प 1 व 2 वर वेळोवेळी काम केल्याचा दावा करणा-या प्रकल्पपीडितांची यादी एका आठवड्यात दफ्तरी नोंदीबरोबर पडताळण्याचे न्यूक्लिअर पॉवर कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापनाने मान्य केले. त्यानंतर प्रकल्प 1 व 2 वर सध्या भरती सुरु असून त्यामध्ये या यादीतील जे - जे प्रकल्पपीडित लायक असतील त्या सर्वांना सामावून घेतले जाईल. त्यासाठी वयाची अट शिथिल करण्यात येईल. एवढेच नव्हे तर जिथे - जिथे कंत्राटी कामे सुरु आहेत तिथे - तिथे कंत्राटदारांना यादीतील प्रकल्पपीडितांना काम देण्यास सांगण्यात येईल असे मान्य करतानाच केंद्र सरकारच्या नव्या धोरणामुळे चतुर्थ श्रेणी कर्मचारी नेमण्यास मात्र न्यूक्लिअर पॉवर कॉर्पोरेशनने आपली असमर्थता व्यक्त केली.

प्रकल्पपीडितांवरील अन्याय दूर व्हावा यासाठी न्यूक्लिअर पॉवर कॉर्पोरेशनने श्री. राम नाईक व श्री. राजेंद्र गावित यांच्या पुढाकारामुळे सकारात्मक दृष्टीकोन स्वीकारल्याने आंदोलनकर्त्या प्रकल्पपीडित कर्मचा-यांनी आपले बेमुदत उपोषण मागे घेण्याचा निर्णय काल घेतला. प्रकल्पपीडिताना एक विशेष बाब म्हणून चतुर्थ श्रेणी कर्मचारी पदावर घेण्याबाबत केंद्रिय मंत्री श्री पृथ्वीराज चौहान यांच्याशी चर्चा करण्याचे आश्वासन यावेळी श्री राम नाईक व श्री राजेंद्र गावित यांनी दिले.

**(कार्यालय सचिव)**